Vol 6 Issue 1 July 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 1 | July - 2016

Golden Research Thoughts
International Recognition Multidisciplinary Research Journal
RNI : MAHMUL/2011/38887
ISSN No: 2231-5063
Impact Factor 2.2052 (UIF) [Yr. 2014]
3.4052 (UIF) [Yr. 2015]
4.6052 (UIF) [Yr. 2016]

GRT Golden Research Thoughts

# अध्यापक–आचार्यांचा तणाव, स्वसामर्थ्य आणि संस्थानिहाय संस्कृती यांच्या सहसंबंधांचा अभ्यास

Ms. Sangeeta Patkar[1] and Dr. S. R. Pandya[2]
[1]College of Education and Research , Mumbai.
[2]Professor , Department of Education, University of Mumbai

**Abstract**
सदर शोधनिबंधाचे प्रमुख उद्दिष्ट शिक्षणशास्त्र महाविदयालयातील अध्यापक–आचार्यांचा तणाव, स्वसामर्थ्य आणि संस्थानिहाय संस्कृती यांच्या सहसंबंधाचा अभ्यास करणे हा होय.
प्रस्तुत शोधनिबंधामध्ये सहसंबंधात्मक पध्दतीचा उपयोग केला. सदर अभ्यासात सुगम यादृच्छिक न्यादर्श, यादृच्छिक न्यादर्श आणि सहज प्राप्त न्यादर्श न्यादर्शाची निवड केली. एकूण अध्यापक–आचार्यांपैकी मराठी व इंग्रजी माध्यमातील शि ाणशास्त्र महाविदयालयातील २२३ अध्यापक–आचार्यांचा समावेश केलेला आहे.
सदर संशोधनासाठी तणाव शोधिका



(Schutz and Long,१९८८), कार्यबध्दता (Schaufeli & Bakker, २००३) संस्थानिहाय बांधिलकी (Allen, Meyer and Smith, १९९३) साधनांचा उपयोग केला.
प्रस्तुत संशोधनात मुंबई विदयापीठाशी संलग्न असलेल्या शिक्षणशास्त्र महाविदयालयातील मराठी व इंग्रजी माध्यमातील अध्यापक–आचार्यांचा तसेच खाजगी अनुदानित खाजगी विनाअनुदानित आणि शासकीय शिक्षणशास्त्र महाविदयालयाचा समावेश केलेला आहे.
प्रस्तुत संशोधनातील निष्कर्षासाठी पियरसनचा सहसंबंध गुणकाचा उपयोग केला.

**Keywords**– तणाव, स्वसामर्थ्य, संस्थानिहाय संस्कृती

## *प्रस्तावना–*

तणाव हे आधुनिकयुगाचे एक प्रमुख वैशिष्टय आहे असे म्हटले जाते. नवनिर्मितीच्या क्षमतेमुळे अनेकलागलेले शोध, उदयोगांचा विकास, शहरांचा विकास, संगणकीकरण, दळणवळणाच्या आधुनिक साधने आणि दूरदर्शनसारखी दृक्श्राव्य माध्यमे यामुळे जग अधिक जवळ येत चालले आहे. पण दुसरीकडे मानसिक अंतर वाढल्यामुळे माणसे एकमेकांपासून दूर जात आहेत. व्यक्तींमधील परस्परसंबंधांमध्ये स्वाभाविकपणाऐवजी कृत्रिमता, भावनिक ओलावाऐवजी कोरडेपणा विशुध्द मैत्रीऐवजी स्वार्थीपणा आढळून येत आहे. व्यक्ती जीवनाशी संबंधित जवळपास सर्वच क्षेत्रांमध्ये व्यक्तींना विविध प्रकारच्या तणावाला सामोरे जावे लागत आहे. तणावामुळेच अनेक व्यक्तींना ह्दयविकार कर्करोग, फुफ्फुसाचे आजार, रक्तदाब इ. विकारांनी ग्रासले आहे. एकंदरीत तणाव हा अनेक प्रश्नांचे मूळ आहे. या परिवर्तनाचा परिणाम समाज व शिक्षणक्षेत्रावर होताना दिसतो.

शिक्षकी पेशात आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षकवर्गाला स्वतःला टिकवून ठेवण्यासाठी विविध प्रकारच्या तीव्र तणावाला सामोरे जावे लागत आहे. आज शिक्षणशास्त्रातील अध्यापक–आचार्यांना नोकरीबद्दल वाटणारी असुरक्षितता, बी. एड्. प्रक्रियेतील विलंब तीव्र स्पर्धा आणि त्यातून होणारा मत्सर, विदयापीठाच्या नियमानुसार अंतर्गत व बाहय कामांची पूर्तता करताना अध्यापक–आचार्यांची होणारी धावपळ प्रशिक्षण महाविदयालयाची गुणवत्ता टिकवून ठेवण्याच्या प्रयत्नात तीव्र तणाव निर्माण होत आहे. या तीव्र तणावाचा परिणाम अध्यापक–आचार्यांच्या वैयक्तिक व व्यवसायात होण्याची शक्यता आहे.

शिक्षणशास्त्र महाविदयालयात अध्यापनाचे कार्य करणाऱ्या अध्यापक–आचार्यांच्या काही सर्वसाधारण अपेक्षा असतात. उदाहरणार्थ शिक्षणशास्त्रातील योग्य पात्रतेची पदवी मिळविल्यानंतर खाजगी अनुदानित किंवा शासकीय महाविदयालयात नोकरी महाविदयालयात

पुरेशा भौतिक सुविधांची उपलब्धता नवोक्रम राबविण्याची आकांक्षा प्राचार्य व सहकाऱ्यांचे सहकार्य इ. अपेक्षा पूर्ण न झाल्याने निराशाजनक विचार मनात येतात. बदलत्या वातावरणात समायोजन साधता येत नाही. अध्यापक–आचार्य, तणावाचा अर्थ कसा लावते यावर तणावातून व्यक्तीची तर्क प्रक्रिया, स्मरण प्रक्रिया, निर्णय क्षमता घटते. एकूणच व्यक्तीच्या बोधात्मक जाणीवेवर तणावाचा परिणाम होतो.

त्याचबरोबर शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अध्यापक–आचार्य हा संस्थाचालक, प्राचार्य, विदयार्थी–प्रशिक्षक यांच्यातील एक महत्वाचा दुवा असतो. महाविदयालयाच्या संस्कृतीनुसार महाविदयालयाची तत्वे, नियम, ध्येये, उद्दिष्टे, महाविदयालयाचे वातावरण, गुणवत्ता वाढविण्यासाठी सांघिक आणि अवघड कार्य स्विकारणे, अध्यापनाचे माध्यम इ. चा बदलत्या काळानुसार अध्यापक–आचार्यांवर कळत नकळत तणाव पडत असते. त्याचा परिणाम त्यांच्या स्वसामर्थ्यावर होऊ शकतो. कामाच्या अधिक तणावातून विपरित परिणाम त्यांच्या शारीरिक मानसिक सामाजिक व भावनिक विकासावर होण्याची शक्यता आहे. सदरच्या संशोधनात अध्यापक –आचार्यांचा तणाव, स्वसामर्थ्य आणि संस्थानिहाय संस्कृतीवर होणारा परिणाम अभ्यासलेला आहे.

## संबंधित साहित्याचे सिंहावलोकन

प्रस्तुत संशोधनात संबंधित साहित्याचा अभ्यास करताना संबंधित संशोधनाचा विषय, उद्दिष्टे, न्यादर्श, संशोधनाची कार्यपध्दती, तंत्रे व संशोधनातून मिळालेले निष्कर्ष यांचा अंतर्भाव केला. सदर अभ्यासात प्राप्त संशोधनाची भारतीय व परदेशात झालेली संशोधने अशी दोन भागांमध्ये विभागणी केलेली आहे.

## भारतीय संशोधने

दास (१९९१) यांनी माध्यमिक शाळेतील शिक्षकांवर येणारा मानसिक तणावाचा शारीरिक, मानसिक आरोग्यावर होणारा प्रभाव सामाजिक पाठिंब्याने कमी होतो काय यावर अभ्यास केला. कालिया (२००९) यांनी NICU संस्थेतील नर्सेसमधील तणाव व त्रस्तता यांचा अभ्यास केला. नर्सेसच्या संवेदनशीलता आणि भावनिक जवळीक साधणाऱ्या व्यवसायाच्या मागणीमुळे तणाव व त्रस्तता अधिक दिसून आली. डिसूझा (२००९) यांनी S S C बोर्डाच्या दहावीच्या १०९२ विदयार्थ्यांचा शैक्षणिक संकल्पना व तणाव यांच्या सहसंबंधांचा अभ्यास केला.सदर संशोधनात केंद्रिय प्रवत्तीची परिमाणे, Pearson's co-efficient correlation, skewness, कुरेत्सिस्या सांख्यिकीय तंत्रांचा उपयोग केला गेला. शैक्षणिक संकल्पना व तणाव यांचा ऋणात्मक संबंध आढळून आला. शर्मा (२०१०) यांनी हिमाचल प्रदेशातील वकिलांची तणाव व त्रस्तता ही व्यावसायिक समाधानाच्या तणावाची पूर्वा नुमानके कोणती आहेत यावर संशोधन केले. टोपो आणि इतर (२०११) यांनी कंत्राटी तत्वानुसार (contract basis) काम करणाया झारखंड येथील माध्यमिक शाळेतील शिक्षकांची त्रस्ततेच्या कारणांचा भारताच्या संदर्भात तिर्यक–छेदात्मक अभ्यास केला.

## परदेशी संशोधने

Haberman (२००४) यांनी काळे आणि गोरे शिक्षकांच्या त्रस्ततेच्या कारणांचा अभ्यास केला. ती कारणे वर्ग व्यवस्थापन शिस्त व्यवस्थापकीय पठिंबा याबाबत शिक्षकांचे संवेदन यांच्याशी संबंधित होती. सदर संशोधनात शहरी शिक्षकांमध्ये ग्रामीण शिक्षकांपेक्षा अधिक तणाव दिसून आला. Pillay and others (२००५) यांनी प्राथमिक व माध्यमिक शाळेतील मध्य कारकिर्दीतील शिक्षकांची क्षमता आणि त्रस्तता यांच्यातील संबंध शोधला. Ozdemir, SeldC (२००६) यांनी टर्कीतील AD/ HD विदयार्थी–शिक्षक आणि Non AD/HD विदयार्थी शिक्षक यांच्या त्रस्ततेच्या पातळीचा फरक पहिला. Anderson, Iwanicki (No date) यांनी शैक्षणिक अनुभव, वय, लिंग, अध्यापनाची पातळी या चलांना नियंत्रित करुन संप्रेरणेचे घटक आणि शिक्षकांची त्रस्तता यांच्यातील संबंधांचा बहुविध–परागमन विश्लेषण (multiple regression analysis) केले. Skaalvik and Skaalvik (२००९) यांनी नॉर्वेजियन शिक्षक–स्वसामर्थ्य मापिकेव्दारा, अंशतः शिक्षकांचे स्वसामर्थ्य व शाळेच्या संदर्भात शिक्षकांची संवेदनशीलता सामुहिक शिक्षकांचे स्वसामर्थ्य, शिक्षकांची त्रस्तता, शिक्षकांचे व्यावसायिक समाधान या घटकांचा अभ्यास केला. Christopher and McCarthy (२००९) यांनी आंतरक्रियात्मक प्रारुपाचे परिक्षण करताना मुख्य उद्देश संसाधने व मागणी यामुळे शिक्षकांमध्ये तणाव निर्माण होते काय? हा होता. आंतरकियात्मक प्रारुपाचे परीक्षण करण्यासाठी प्राथमिक शाळेतील शिक्षकांचा तणाव आणि शिक्षकांच्या त्रस्ततेची लक्षणे यांचा अभ्यास केला गेला. Fernet, Guay, Senecal and Austin (२०१२) यांनी संप्रेरणेचे आंतरव्यक्ती परिवर्तन प्रारुपाचे आत्मनिर्धार/आत्मनिश्चय यासंबंधित भावनिक थकवा, वैयक्तिकरित्या कमी प्रामाणात कार्यसिध्दीस नेणे, अव्यक्तिकरण याचे परीक्षण केले आणि याचा परिणाम शिक्षकांच्या त्रस्ततेवर होतो का? याचा अभ्यास केला. Hultell, and others (२०१३) यांनी केलेल्या अभ्यासात असे आढळून आले की शिक्षकांच्या त्रस्तता ही दिर्घकाळ स्थिर असते.

## संशोधनाची गरज

शिक्षणशास्त्र महाविदयालयात उत्तम विदयार्थी–शिक्षक तयार करणे हे प्रमुख कार्य असते. सुयोग्य विदयार्थी–शिक्षक तयार करताना प्रशिक्षण काळात अध्यापक–आचार्यांना खूप कामे करावी लागतात. विदयार्थी–शिक्षकांसाठी नवोक्रम राबविणे, विदयापीठाने निर्धारीत केलेला अभ्यासक्रम (internal and external) पूर्ण करणे, महाविदयालयात नेमून दिलेल्या विविध विभागाची जबाबदारी सांभाळणे, व्यावसायिक वृध्दीसाठी सातत्याने प्रयत्न करणे इत्यादी कार्ये करीत असताना अध्यापक–आचार्यांच्या कळत–नकळत तणाव निर्माण होतो. अध्यापक–आचार्यांचे स्वसामर्थ्य आणि संस्थेची संस्कृती याचा त्यांच्या तणावाशी सहसंबंध आहे का यासाठी या शोधनिबंधाचे प्रयोजन आहे.

प्रस्तुत संशोधनात शिक्षणशास्त्र महाविदयालयाची संस्कृती, अध्यापक–आचार्यांचा तणाव आणि त्यांचे स्वसामर्थ्य यांच्या सहसंबंधांच्या अभ्यासामुळे महाविदयालयाचे व्यवस्थापन, प्राचार्य आणि अध्यापक–आचार्य यांना तणावाचे क्मातीकरण करणे सोपे जाईल.

तसेच आजच्या स्पर्धेच्या काळात अध्यापक–आचार्यांना स्वतःला टिकवून ठेवण्यासाठी स्वतःचे स्वसामर्थ्य विकसित करणे ही काळाची गरज आहे. स्वतःचे विचार प्रभावीपणे मांडण्यासाठी, पटवून देण्यासाठी स्वसामर्थ्याची गरज असते. प्रस्तुत संशोधनातून अध्यापक–आचार्यांना स्वतःच्या स्वसामर्थ्याची जाणीव होईल. याचा फायदा प्राचार्य, विदयार्थी–शिक्षक आणि पर्यायाने संस्थेला होईल. म्हणूनच भारतात आजच्या काळात संशोधिकेला प्रस्तुत संशोधन अतिशय महत्वाचे वाटते.

**संशोधन समस्या :** अध्यापक–आचार्यांचा तणाव, स्वसामर्थ्य आणि संस्थानिहाय संस्कृती यांच्या सहसंबंधांचा अभ्यास

### कार्यात्मक व्याख्या

तणावः अध्यापक–आचार्याचे जेव्हा महाविदयालयासंबंधीच्या अपेक्षा, व्यावसायिक वृध्दी आणि त्यांच्यातील सामाजिक आंतरक्रियासंबंधित अपेक्षा, समायोजन क्षमतेपक्षा वाढतात, तेव्हा त्या घटनेस अध्यापक–आचार्यांनी दिलेला प्रतिसाद.

स्वसामर्थ्यः ठरविलेली उद्दिष्टे लक्ष अगर ध्येय गाठण्याच्या बाबतीत अध्यापक–आचार्यांने स्वतःच्या कुवतीविषयी किंवा गुणवत्तेविषयी जे मूल्यांकन केलेले असते ते स्वसामर्थ्य होय.

संस्थानिहाय संस्कृतीः महाविदयालयातील अध्यापक–आचार्यांची पूर्वाभिमुखता, सांघिक व अवघड कार्यासाठीचे पूर्वाभिमुखता, फलनिष्पत्ती पूर्वाभिमुखता, नवोक्रम व जोखिमेचे कार्य स्विकारणे, संशोधन पूर्वाभिमुखता, नेतृत्व आणि सामान्य वातावरण होय.

### संशोधनाचे ध्येय

प्रस्तुत संशोधनातील विशाल ध्येय पुढीलप्रमाणे आहे :

अध्यापक–आचार्यांचा तणाव, स्वसामर्थ्य आणि संस्थानिहाय संस्कृती यांच्या सहसंबंधांचा अभ्यास करणे.

### संशोधनाची उद्दिष्टे

सदर संशोधनाची विशिष्ट उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेतः
१.शिक्षणशास्त्र महाविदयालयातील अध्यापक–आचार्यांचा तणाव आणि स्वसामर्थ्य यांच्या सहसंबंधाचा अभ्यास करणे.
२.शिक्षणशास्त्र महाविदयालयातील अध्यापक–आचार्यांचा तणाव आणि संस्थानिहाय संस्कृती यांच्या सहसंबंधाचा अभ्यास करणे.
३.शिक्षणशास्त्र महाविदयालयातील अध्यापक–आचार्यांचा तणाव, स्वसामर्थ्य आणि संस्थानिहाय संस्कृती यांच्या सहसंबंधाचा अभ्यास करणे.

### शून्य परिकल्पना

सदर संशोधनात शून्य परिकल्पनेचा वापर करण्यात आला त्या पुढीलप्रमाणे आहेतः
१.शिक्षणशास्त्र महाविदयालयातील अध्यापक–आचार्यांचा तणाव आणि स्वसामर्थ्य यांमध्ये लक्षणीय सहसंबंध नाही.
२.शिक्षणशास्त्र महाविदयालयातील अध्यापक–आचार्यांचा तणाव आणि संस्थानिहाय संस्कृती यांमध्ये लक्षणीय सहसंबंध नाही.
३.शिक्षणशास्त्र महाविदयालयातील अध्यापक–आचार्यांच्या तणावाचा, त्यांचे स्वसामर्थ्य आणि संस्थानिहाय संस्कृती यांमध्ये संयु@तरीत्या लक्षणीय सहसंबंध नाही.

### संशोधन पध्दती

शिक्षणशास्त्र महाविदयालयातील अध्यापक–आचार्यांचा तणाव, स्वसामर्थ्य आणि संस्थानिहाय संस्कृती यांच्या सहसंबंधांचा अभ्यास करावयाचा असल्याने सहसंबंधात्मक पध्दतीचा उपयोग केला.

### न्यादर्श

सदर अभ्यासात तीन प्रकारे न्यादर्शाची निवड केली. प्राथमिक स्तरावर यादृच्छिक न्यादर्श (Stratified Random Sampling) तंत्राने शासकीय, खाजगी–अनुदानित आणि खाजगी–विनाअनुदानित मुंबई विदयापीठाशी संलग्न असलेली शिक्षणशास्त्र महाविदयालये निवडण्यात आली.

व्दितीय स्तरावर सुगम स्तरीय यादृच्छिक न्यादर्श (Simple Stratified Random Sampling) तंत्राने मराठी व इंग्रजी माध्यमातील महाविदयालयांचा समावेश केला.

तृतीय स्तरावर संशोधिकेचे नियंत्रण नसल्याने सहजप्राप्त न्यादर्श तंत्राने (Incidental Sampling) एकूण अध्यापक–आचार्यांपैकी मराठी व इंग्रजी माध्यमातील शि ाणशास्त्र महाविदयालयातील २२३ अध्यापक–आचार्यांचा समावेश केला.

### सदर संशोधनातील साधने

सदर संशोधनात माहितीचे संकलन करण्यासाठी खालील साधनांचा उपयोग केलाः
१. तणाव शोधिका (Schutz & Long,१९८८)
२. स्वसामर्थ्य (Bandura,१९८८)
३. संस्थानिहाय संस्कृती (Researcher self made tool)

### संशोधन विश्लेषणाची तंत्रे

प्रस्तुत संशोधनात माहितीच्या विश्लेषणासाठी खालील तंत्राचा उपयोग केलाः[1]
अनुमानात्मक माहितीचे विश्लेषण –१.पियरसनचा सहसंबंध गुणक

### संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा

प्रस्तुत संशोधनात मुंबई विदयापीठाशी संलग्न असलेल्या शिक्षणशास्त्र महाविदयालयातील मराठी व इंग्रजी माध्यमातील अध्यापक–आचार्यांचा समावेश केला.

प्रस्तुत अभ्यासात शिक्षणशास्त्र महाविदयालयात कार्य करणारे अध्यापक–आचार्यांचा तणाव आणि त्यांचे स्वसामर्थ्य या चलांचा परस्परांशी असलेला सहसंबंधांचा अभ्यास केला.

प्रस्तुत संशोधनात मराठी व इंग्रजी खाजगी अनुदानित खाजगी विनाअनुदानित आणि शासकीय शिक्षणशास्त्र महाविदयालयाचा समावेश केलेला असून प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक, कला, वाणिज्य, शास्त्र शाखेतील अध्यापक–आचार्य तसेच डी. एड्चे अध्यापक [1]आचार्यांचा समावेश केलेला नाही. सदरच्या अभ्यासात हिंदी उर्दू व गुजराती माध्यमातील, शिक्षणशास्त्र महाविदयालयात कार्य करणारे अध्यापक–आचार्यांचा समावेश केलेला नाही.

Volume - 6 | Issue - 1 | July - 2016

प्रस्तुत अभ्यासात अध्यापक–आचार्यांचा तणाव, स्वसामर्थ्य आणि संस्थानिहाय संस्कृती या चलांचा विचार केलेला असून इतर मानसशास्त्रीय चलांचा समावेश केलेला नाही.

## संशोधनाचे निष्कर्ष

सदर संशोधनाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेतः

### १. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अध्यापक–आचार्यांचा तणाव आणि स्वसामर्थ्य यामध्ये लक्षणीय सहसंबंध नाही.

सदर शून्य परिकल्पनेच्या परीक्षणासाठी पियरसन्स सहसंबंध गुणकाचा वापर करण्यात आला. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अध्यापक–आचार्यांचा तणाव आणि स्वसामर्थ्य यामधील सहसंबंध अभ्यासताना प्राप्त 'r' ची किंमत (०.४१५) ही (P = < ०.०००१) लक्षणीय आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग केला. यावरून असे दिसून येते की, शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अध्यापक–आचार्यांचा तणाव आणि स्वसामर्थ्य यामध्ये लक्षणीय सहसंबंध असून हे संबंध धनात्मक आणि मध्यम प्रतीचे आहेत.

### २. शिक्षणशास्त्र महाविदयालयातील अध्यापक–आचार्यांचा तणाव आणि संस्थानिहाय संस्कृती यांमध्ये लक्षणीय सहसंबंध नाही.

सदर शून्य परिकल्पनेच्या परीक्षणासाठी पियरसन्स सहसंबंध गुणकाचा वापर करण्यात आला. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अध्यापक–आचार्यांचा तणाव आणि संस्थानिहाय संस्कृती यामधील सहसंबंध अभ्यासताना प्राप्त 'r' ची किंमत (०.३८१८) ही (P = < ०.०००१) लक्षणीय आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग केला. यावरून असे दिसून येते की, शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अध्यापक–आचार्यांचा तणाव आणि संस्थानिहाय संस्कृती यामध्ये लक्षणीय सहसंबंध असून हे संबंध धनात्मकआणि निम्न प्रतीचे आहेत.

### ३. शिक्षणशास्त्र महाविदयालयातील अध्यापक–आचार्यांच्या तणावाचा, त्यांचे स्वसामर्थ्य आणि संस्थानिहाय संस्कृती यांमध्ये संयु@तरीत्या लक्षणीय सहसंबंध नाही.

सदर शून्य परिकल्पनेच्या परीक्षणासाठी पियरसन्स बहु–सहसंबंध गुणकाचा वापर करण्यात आला. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अध्यापक–आचार्यांचा तणाव, स्वसामर्थ्य आणि संस्थानिहाय संस्कृती यामधील बहु–सहसंबंध हा '$R^{२}_{१.२३}$ ' =०.२८२९, ($R_{१.२३}$ = ०.५३१९ ) हे (P = < ०.००१) लक्षणीय आहे. यावरून असे दिसून येते की, शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अध्यापक–आचार्यांच्या तणावाचे ५३.१९% प्रसरण हे अनुक्रमे त्यांचे स्वसामर्थ्य आणि संस्थानिहाय संस्कृतीशी संबधित आहे. अध्यापक–आचार्यांच्या तणावाचे १५.५२% प्रसरण स्वसामर्थ्याशी संबधित असून १२.७७% प्रसरण संस्थानिहाय संस्कृतीशी संबधित आहे.

## चर्चा

यावरून असे दिसून येते की, शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अध्यापक–आचार्यांच्या तणावाचा सहसंबंध स्वसामर्थ्य आणि संस्थानिहाय संस्कृतीशी आहे. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अध्यापक–आचार्यांना स्वतःची कुवत, कौशल्ये, गुणवत्तेची नव्याने होत असलेल्या जाणीवेमुळे त्यांच्यांत तणाव निर्माण होत असेल. तसेच महाविद्यालयात अध्ययन–अध्यापन प्रक्रियेमध्ये सृजनशीलता आणण्याचा प्रयत्न, अध्यापक–आचार्यांच्या संशोधनवृत्तीचा विकास, अध्यापक–आचार्यांनी आत्मसात केलेली आवश्यक विविध प्रशिक्षणे विदयार्थी–शिक्षकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे इत्यादी घटकांच्या परिणामांमुळे शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अध्यापक–आचार्यांमध्ये तणाव निर्माण होत असेल.

तसेच महाविद्यालयातील नवोक्रम व जोखिमेचे कार्य करताना, सहकार्यांबरोबर योग्य प्रकारे समायोजन साधताना आणि महाविद्यालयातील कार्ये यशस्वीरीत्या पार पाडताना देखील तणाव निर्माण होत असेल. यावरून असे म्हणता येईल की, अध्यापक–आचार्यांच्या तणावाचा धनात्मक सहसंबंध स्वसामर्थ्य आणि संस्थानिहाय संस्कृतीशी आहे.

## संदर्भ सूची


१.पारसनीस, न.रा.¸प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र,¸ नूतन प्रकाशन,¸ पुणे

२.सोहोनी,श. कृ. शैक्षणिक टीपाकोश, पुणे

३.करंदीकर,सुरेश.¸शैक्षणिक मानसशास्त्र,¸नूतन प्रकाशन,¸ पुणे

४.जोशी, बी.आर. आणि इतर¸ डायमंड पब्लिकेशन,पुणे

५.कर्डिले व्ही व डॉ. महाले एस्. संशोधनात सांख्यिकी तंत्रांचे उपयोजन, एम्. एड्. शिक्षणक्रम¸य.च.म.मु.वि. नाशिक

६.पंडीत बन्सी बी. आणि डॉ.मोरे लता. शिक्षणशास्त्र संशोधनात सांख्याशास्त्रीय परीक्षिकांचा उपयोग,¸पिंपळापुरे ॲन्ड कं पब्लिशर्स,¸ नागपूर

7.Agarwal, R. (2001).Stress in life and at work, Response Books New Delhi

8.Agarwal, V. (1983). A study of Stress Proneners Adjustment and Job satisfaction as Predictors of Administrative effectiveness of Principals, Unpublished Ph D thesis submitted to University of Meerut, Meerut

9.Best and Kahn (2007).Research in Education, Prentice Hall of India, New Delhi

10.Cherniss, C. (1980). Staff Burnout, Job Satisfaction in the Human Services, Sage Publication, New Delhi

11.D'souza, G. (2009).A Study of Stress in Students of std.X in Relation to their Academic Self, St. Teresa's Institution of Education. The Hindustan Times, Mumbai

12.Dandekar, W.N.(2004). Evaluation in Schools. Pune: Shreevidya Publication

13.Edelwich, J. (1981). Burn Out: Stages of disillusionment in the helping profession Human Science Press, New York
14.Jean, A. (20000. The relationship of teacher efficacy, burnout experience and the referral of disruptive studies, Dissertation Abstracts International Vol. 61, Pp.78
15.Joshi, C. P. and Singhavi, M.K. (2000). A Study of Burnout in Teachers, Indian Journal of Clinical Psychology, Vol. 27, no. 1 New Delhi
16.Joshi, C. P.(1999). A Study of Stress and Burnout, PrintWell Publishers and Distributors, Jaipur
17.Kothari, C.R.(2001). Research Methodology- Methods and Techniques, New Delhi: New Age International (P) Ltd.
18.Koul, L (1984).Methodology of Educational Research. Prentice Hall of India, New Delhi
19. anetje,O., and Martins, N.(2009). The relationship between organizational culture and organizational commitment. Southern African Business. Review,13(1) http://www.unisa.za/contents/faculties/service_dept/docs/relationship SABVIII3chap5,pdf
20.Tage, S. (et. al).(2005). The Copenhegan Burnout Inventary: A new tool for the assessment of Burnout, Work and Stress National Institution of Occupational Health, USA
21.Times of India May 10, 2006 Lucknow edition
22.Tripathai V., (2013) ,' A Study of Role Stress, Bournout and Coping Style of Teacher Educators', Department of Education, Faculty of Education and Psychology Unpublished Ph D Thesis, The Maharaja Sayajirao University, Baroda
23.Websites: www.elsevier.com/locate/tate
24.ttp://tes.sagepub.com/content/24/1/58
25.www.eric.ed.gov
26.www.sciencedirect.com



**Ms. Sangeeta Patkar**
**College of Education and Research , Mumbai.**

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org